**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

डॉ.सौ.पुष्पलता पांडुरंग सोनवले
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ०१/ सांगली / २००६ |
| २.सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत कार्यक्रम) | १४.५.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.सौ.पुष्पलता पांडुरंग सोनवले
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली प्रतिनिधी डॉ.एल.एस.साळे

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली विद्यमान-डॉ.एल.एस.साळे, तत्कालीन-डॉ.जे.टी.खरमाटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | ९.३.२००६ |
| ५. | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | -- |
| ६. | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | २.५.२००६ |
| ७. | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | १८.५.२००६ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचणी, ता.तासगाव येथील सरपंच यांच्या तक्रार अर्जाचा चौकशी अहवाल, तक्रार अर्जात सरपंचांनी सूचित केलेल्या सर्वांच्या बदल्या केल्या जातात अथवा त्याला काही नियम आहे, राजपत्रित अधिकाऱ्याचा विनाआरोप पगार किती महिने रोखता येतो, पोस्टाने पाठवायच्या आतील पत्त्यावर रजिस्टर तारीख आणि वरिष्ठांच्या सहीने पाकीटावर यूपीसी असे करता येते काय, कोणत्या नियमाने.

## विवेचन

प्राथमिक आरोग्य केंद्र, चिंचणी, तालुका तासगाव येथील सरपंचांनी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्त्या डॉ.सौ.पुष्पलता पांडुरंग सोनवले यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही, म्हणून सौ.सोनवले यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे अपील केले. परंतु हा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अंतर्गत केलेला असल्यामुळे व हा कायदा रद्द होऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आलेला असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, सांगली यांनी अर्ज निकाली काढला. त्याविरुध्द सौ.सोनवले यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे अपील केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना विषय आपल्यापुढे ठेवण्याचे सांगूनही त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास तो आणला नाही असे नमूद करुन सौ. सोनवले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१८.३.२००८ रोजी पुणे येथे झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता, परंतु आपल्याला कोणतीही माहिती मिळालेली नसल्याचे सौ.सोनवले यांनी नमूद केले. 'तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी यापूर्वीच माहिती पुरविली असल्याचे समजले. परंतु दिलेल्या माहितीची प्रत कार्यालयात आढळून येत नाही,' असे विद्यमान जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.एल.एस.साळे यांनी नमूद केले. सौ.सोनवले यांची माहिती न मिळाल्याबाबतची तक्रार कायम राहिल्यामुळे दि.१४.५.२००८ रोजी सांगली येथे अपिलाची सुनावणी घेण्यात आली. काही माहिती त्याआधी देण्यात आली व सुनावणी दरम्यान आयोगाने दिलेल्या आदेशानुसार ऊर्वरित माहिती दि.२१.५.२००८ रोजी पाठविण्यात आली, असे डॉ.साळे यांनी दि.२२.५.२००८ रोजी आयोगाला कळविले. दोन वर्षे दोन महिने चार दिवस झाल्यानंतर आपल्याला माहिती मिळाली. सुनावणीच्या आदल्या दिवशी काही माहिती दिली, ती चुकीची आहे, असे सौ.सोनवले यांनी प्रतिपादन केले.

सौ.सोनवले या वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करीत असतानाच्या काळात त्यांच्याविरुध्द झालेल्या तक्रारी, त्या अनुषंगाने केलेली चौकशी व त्यांच्यावरील कारवाई या संबंधातील हा विषय आहे. तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जे.टी.खरमाटे हे दिनांक ३१.५.२००६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. सौ.सोनवले याचां अर्ज दि.९.३.२००६ चा होता, त्यावर त्वरित कार्यवाही करण्याबाबत संबंधित मेजचे लिपीक श्री.बी.डी.कुंभार यांना वारंवार सूचना देऊनही त्यांनी त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच सौ.सोनवले यांचा दि.२.५.२००६ चा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकारा अन्वये केला असल्यामुळे निकाली काढला,' असे डॉ.जे.टी.खरमाटे यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

आपण दि.८.६.२००६ पासून जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली या पदावर हजर झाल्यानंतरही लिपीक श्री.बी.डी.कुंभार यांनी 'सौ.सोनवले यांचा अर्ज आपल्या निदर्शनास आणला नाही. सौ.सोनवले यांनी दि.२३.५.२००६ रोजी केलेले प्रथम अपील दि.३०.५.२००६ रोजी प्राप्त झाले, त्यानंतरही श्री.कुंभार यांना आपण वेळोवेळी लेखी सूचना देऊनही त्यांनी अर्ज निदर्शनास आणणे अथवा माहिती देणे याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. श्री.कुंभार यांना कारणे दाखवा नोटिसाही देण्यात आल्या. तथापि त्यांनी त्यांचा खुलासा अथवा माहिती सादर केली नाही. त्यामुळे या सर्व विलंबास श्री.कुंभार जबाबदार आहेत, असे विद्यमान जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.एल.एस.साळे यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. 'माहिती त्वरित न दिल्यास विलंबाबाबतच्या दंडात्मक कारवाईस तुम्ही व्यक्तिशः जबाबदार राहाल,' असे डॉ.खरमाटे यांनी श्री.कुंभार यांना दिलेल्या लेखी सूचनेत स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

सर्व संबंधित कागदपत्रांच्या प्रती सादर करण्याचे आदेश आयोगाने दिले, त्यानुसार श्री.कुंभार यांना आठवड्याच्या आढावा बैठकीत वेळोवेळी सूचना दिल्याचे या कागदपत्रांमध्ये नमूद केलेले दिसते. मात्र त्यांना जाणीव देणारे पत्र दि.२७.९.२००७ चे असून 'कारणे दाखवा नोटिसा' सन २००८ मधील आहेत. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गांभीर्याने माहिती अर्जाच्या हाताळणीबाबत दखल घेतलेली नाही, असे सर्व कागदपत्रांवरुन स्पष्टपणे दिसते.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश २००२ अन्वये अर्ज असल्याचे चुकून नमूद केले गेले, हे सौ.सोनवले यांचे स्पष्टीकरण मान्य करता येणार नाही, त्यामुळे त्याखालील अर्ज निकाली काढण्याचा निर्णय अयोग्य नाही. पत्र नोंदणीकृत टपालाने पाठविल्याचे नमूद करुन डॉ.खरमाटे यांनी त्यावर सही केली आहे, मात्र प्रत्यक्षात टपालाचा दाखला घेऊन (यूपीसी) पत्र पाठविले गेले हे डॉ.खरमाटे यांच्या भ्रष्टाचाराचे एक उदाहरण असल्याचे विधान सौ.सोनवले यांनी पत्रव्यवहारातही केले असून सुनावणीत त्यांनी त्याचा पुनरुच्चार केला. मात्र उपलब्ध तिकिट साठा लक्षात घेऊन

टपालाचा दाखला घेऊन पत्र पाठविण्यात आले व तेवढाच खर्च करण्यात आला आहे, असे डॉ.खरमाटे यांनी स्पष्ट केले. मात्र तसाच उल्लेख पत्रावरही करणे आवश्यक होते.

सौ.सोनवले यांनी अनेक अर्ज केलेले असून सर्व पत्रव्यवहारात डॉ.खरमाटे यांच्यावर भ्रष्टाचार व गैरव्यवहाराचे आरोप केले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी त्यांच्या अपिलावर दिलेल्या शेऱ्याची छायांकित प्रत सादर करुन त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुध्द आरोप करणारे निष्कर्ष काढले आहेत. याचा माहितीशी संबंध नाही. मात्र त्यांनी मागितलेली माहिती त्यांना विहित मुदतीत दिली जाणे आवश्यक होते. संबंधित लिपीक श्री.बी.डी.कुंभार हे विलंबाला जबाबदार असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. याबाबतचा खुलासा सादर करण्याचा आदेश आयोगाने दिल्यानंतरही श्री.कुंभार यांनी दि.१६.९.२००८ पर्यंत खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे त्यांनी जाणीवपूर्वक माहिती नाकारल्याचे स्पष्ट होते व त्याबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

सौ.सोनवले यांच्यावरील आरोप, त्यांच्याविरुध्दच्या तक्रारींची चौकशी व अन्य बाबींची माहिती त्यांना देण्यात आली आहे. मात्र सौ.सोनवले यांची मूळ मागणी चार महिन्यांचा पगार, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व बदली रद्द करणे अशी कार्यवाहीची असून सर्व पत्रव्यवहारात त्यांनी ती नमूद केली आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) माहिती देण्यास झालेल्या विलंबाबद्दल तत्कालीन लिपीक श्री.बी.डी.कुंभार यांना जबाबदार धरण्यात येत आहे व रुपये २५०००/- शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती ऑक्टोबर महिन्यापासून मिळणाऱ्या पुढील महिन्यांच्या पगारातून पाच हप्त्यात वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा

करण्याची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच याबाबत संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्याच्या छायांकित प्रती आयोगाला सादर कराव्यात. ही जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांची राहील.

(३) अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी प्रथम अपिलाची, तसेच माहितीबाबतच्या पुढील कार्यवाहीची गांभीर्याने दखल न घेतल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७.९.२००८**

सप्टेंबर-३२-३७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००० / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विकास भिमराव गायकवाड<br>रा. बडापूरी, ता. इंदापूर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक ग्रंथालय संचालक,<br>नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य,<br>मुंबई-४०० ०२३ | हजर |

अपीलकर्ता श्री. विकास भिमराव गायकवाड यांनी दि. ३.५.२००७ च्या अर्जान्वये मंजूर वाचनालया संदर्भातील दप्तर, रजिस्टर्स, इतर माहिती अवलोकनार्थ व त्यानंतर त्यातील आवश्यक माहिती निश्चित केल्यानंतर ती प्राप्त होण्याची मागणी केली होती.

त्यानुसार कार्यवाही पूर्ण होऊन माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले. माहिती प्राप्त झाली असून कुठलीही तक्रार नसल्याचे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** १२.९.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २४.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्रीमती अरूणा अरविंद घंटा<br>द्वारा श्रीराम जलेपल्ली<br>८३०, क्षीरसागर वाडा, भवानी मंदिरामागे,<br>भवानी पेठ, पुणे- ४११ ०४२ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, मावळ, जि. पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, मावळ, जि. पुणे | हजर |

अपीलकर्त्या श्रीमती अरूणा अरविंद घंटा यांनी दि. ९.४.२००७ च्या अर्जान्वये मौजे नानोली ता. मावळ येथील (स.नं.४६) गट नंबर १०६ या जमिनीस त्यांच्या पतीचे नाव लावणे संदर्भात १९९२ पासून आजतागायत कार्यवाही का झाली नाही, याची माहिती मागितली होती.

सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ, ता. मावळ यांनी दि. ४.५.२००७ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविले आहे. सदरचा ७/१२ त्यांना दाखविण्यात आला असून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये नाव लावले जाईल, असे सांगण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मावळ यांनी नमूद केले आहे.

अपीलकर्त्याने केलेली मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही, असे वरील सर्व बाबींचा विचार करता तसेच सादर केलेली निवेदने, उपलब्ध कागदपत्रे पाहता दिसून येते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १२.९.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपिल निर्गत कार्यक्रम दि.२४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१३/पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुशिलकुमार गोवर्धनदास बाहेती,<br>प्लॉट नं.२१८, सेक्टर नं.२४,<br>प्राधिकरण निगडी पुणे ४११ ०४४ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, निवासी नायब तहसिलदार,<br>मावळ तहसिल कार्यालय, जि.पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अपिलीय अधिकारी, तहसिलदार,<br>मावळ तहसिल कार्यालय, जि.पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. सुशिलकुमार गोवर्धनदास बाहेती यांनी मौजे साते, ता.मावळ येथील गट क्र.१४५-अ, १४५-ब चे संगणक ७/१२ वरील फेरफार उतारे सह इतर ७ फेरफार उताऱ्याच्या सत्यप्रतींची मागणी जन माहिती अधिकाऱ्यांकडे केली होती.

अपीलकर्त्यांनी मागणी केलेलली माहिती तयार आहे. तसेच संगणीकृत ७/१२ करिता आवश्यक शुल्क भरण्यास अपीलकर्त्यास कळविले. तथापि अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याशी संपर्क साधला नाही. तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर होता. अपीलकर्त्याने अर्जावर व अपिलांवर स्वत: स्वाक्षरी केलेली नाही. श्री.व.ना.पाटील यांच्या कार्यालयातील स्वाक्षरी असल्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे.

• माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहितीचा अर्ज प्रथम व द्वितीय अपीलांवर, प्रतिज्ञापत्रावर अपीलकर्त्याने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. स्वत:चे नाव वापरुन अन्य व्यक्तीने

अर्जदाराची स्वाक्षरी करुन त्रयस्थांमार्फत अर्ज करणे मान्य केले जाणार नाही. कायद्याच्या दृष्टीने हा गैरप्रकार असून अपीलकर्ता व त्यांच्या स्वाक्षऱ्या करणारे यांना याबाबत कडक समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १२/०९/२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. निजलिंगप्पा महादेव इंगळे
९२९, बुधवार पेठ, सोलापूर

अपीलकर्ता

विरूध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
सहाय्यक ग्रंथालय संचालक,
नविन मध्यवर्ती इमारत,
पुणे ४११००१

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
शासकीय माहिती अधिकारी,
सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१३/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २.०९.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने अर्ज केल्याची तारीख | २२.११.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ३०.११.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १८.१२.२००७ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालय, सोलापूर यांचे शासन मान्यते बाबत. |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री निजलिंगप्पा महादेव इंगळे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालयास शासन मान्यता का देण्यात आली नाही, याची माहिती जन माहिती अधिकारी तथा शासकीय माहिती अधिकारी, सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय, पुणे यांचेकडे मागितली होती.

अपीलकर्त्यांस लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्व.वाचनालयाच्या मान्यते संदर्भात माहिती देण्यात आली आहे. अपिलासोबत सादर केलेली कागदपत्रे पाहता वाचनालयास मान्यता देणे - न देणे ही प्रशासकीय कार्यवाहीची बाब आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि.१६.१०.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. २४.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १०१५ / पुणे | मेजर जन.एस.सी.एन. जठार, निवृत्त अे-१०२, नीलसदन, १४२६ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३७ | कामगार व जनता संपर्क अधिकारी, पुणे महानगर-पालिका परिवहन उपक्रम, पुणे | महाव्यवस्थापक, पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रम, पुणे | मुख्य अभियंता, पी.एम.टी. स्वारगेट यांचे कार्यालयाशी संबंधित काही चौकशी अहवाल, कार्यवाही व इतर माहितीची मागणी | दि. ८.७.२००८ च्या लेखी पत्राद्वारे आयोगास अपील निकाली ठेवण्याबाबत कळविले आहे. |
| ११८१ / पुणे | ॲड. प्रसादर माधव बहिरट २७६अ, बहिरट कॉम्लेक्स, पहिला मजला, शिवाजीनगर गावठाण, बहिरट अळी, पुणे-५ | नगर भूमापन अधिकारी, हवेली क्र.१, पुणे | अधीक्षक व भूमि अभिलेख तहसीलदार कचेरी, पुणे | शिवाजीनगर नगर भूमापन क्र.२७७६ /अ/३, १०४१ व १०९०/ब या मालमत्ता पत्रकावरील नोंदी संदर्भात वाटपपत्राची प्रतीची मागणी | दि. ५.७.२००८ च्या लेखी पत्राद्वारे नकला मिळाल्याचे व अपील निकाली ठेवण्याबाबत आयोगास कळविले आहे. |
| २२४ / पुणे | श्री. संजय रामचंद्र सोलापूरकर, प्रथमेश सह.गृह. संस्था मर्या., महात्मा सोसायटी जवळ, स.नं.६७, कोथरूड, पुणे-३८ | उप आयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका पुणे | आयुक्त (जनरल), पुणे महानगर -पालिका पुणे | बांधकाम न झालेल्या प्लॉटची कर आकारणी करून कोणतीही सुविधा न देता कर आकारणी केले संदर्भात खुलाशाची मागणी | दि. १६.५.२००८ च्या लेखी पत्राद्वारे अपील मागे घेत असल्याचे आयोगास कळविले आहे. |

अपीलकर्त्यांची लेखी विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तीनही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १० .९.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२१ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. वसंतराव निवृत्तीनाथ गाडवे-पाटील<br>रा. कामशेत (खडकाळे), ता.मावळ, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याध्यापक, गुरूकुल हायस्कूल, लोणावळा, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सचिव, विद्या विनय सभा, गुरूकुल, लोणावळा. जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. वसंतराव निवृत्तीनाथ गाडवे-पाटील यांनी दि. १७.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये गुरूकुल, तुंगार्ली, लोणावळा येथे सन २००६ साली कनिष्ठ लिपिक भरती संदर्भात १ ते २० मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गुरूकुल हायस्कूल, लोणावळा यांच्याकडे मागितली होती.

दि. १.५.२००७ च्या पत्राने शुल्कासंबंधी अपीलकर्त्यास कळविले होते. सदर पत्र त्यांनी स्वीकारले नाही. रक्कम रू.११६/- भरणेबाबत सविस्तर माहिती दि. १२.६.२००७ रोजी कळविली. आजही माहिती तयार आहे. शुल्क भरल्यास देता येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. माहिती आवश्यक असल्यास अपीलकर्त्याने शुल्क भरून प्राप्त करून घ्यावी.

**पुणे**
**दि. १० .९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विकास भिमराव गायकवाड<br>मु.पो.वडापूरी, ता. इंदापूर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. विकास भिमराव गायकवाड यांनी सन २००४ ते नोव्हेंबर २००६ अखेर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, पुणे यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विकास कामांच्या अनुषंगाने विविध मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग यांनी अपीलकर्त्यास कार्यालयात बोलावून माहिती दाखविली असल्याचे, त्यांच्या शंकांचे निरसन केल्याचे, तसेच आवश्यक ती माहिती त्यांना दिल्याचे नमूद केले.

आपल्या शंकांचे निरसन झालेले असून एकूण २४६ पाने माहिती प्राप्त झालेली आहे. त्यामुळे अपील मागे घेत आहे, असे तीनही घटकांमधील चर्चेअंती अपीलकर्त्याने नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १२.९.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.बाजीराव सगु जाधव<br>स.नं.७०, जे.जी.गायकवाड चाळ,<br>वार्ड नं.३,दापोडी,पुणे १२ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली<br>जि.पुणे | हजर |

मौजे भोसरी, ता.हवेली येथील स.नं.२१३/१० पैकी क्षेत्र खरेदी दि.२६.०२.२००७ रोजी केली होती. मात्र ७/१२ ला अद्याप नाव का आले नाही, याची माहिती अपीलकर्ता श्री.बाजीराव सगु जाधव, स.नं.७०, जे.जी.गायकवाड चाळ, वार्ड नं.३,दापोडी,पुणे १२ यांनी मागितली होती.

विषयांकित जमीन महारवतन संवर्गातील असून विनापरवानगी खरेदीखत केले असल्याने शर्तभंग झाल्याने ७/१२ सदरी नोंद करता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे यांनी सांगितले.

वरील बाबी पाहता कायदेभंग झाल्याने जी कार्यवाही करणे नियमबाह्य आहे ती करण्याची अपीलकर्त्याची मागणी आहे. मागणी अयोग्य असून प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. तसेच 'सदरचा अर्ज श्री.म.ना.पाटील, श्री.गणेश अपार्टमेंट, ५८७ बुधवार पेठ, पुणे यांनी केलेला असून सदर कामापोटी त्यांनी वेळोवेळी आपल्याकडून

रक्कम रु.२०००/- घेतलेली आहे व आपल्याला माहिती मिळाली आहे'. असे अपीलकर्त्याने नमूद केले. आयोग याची गंभीर दखल घेत आहे. एखाद्या व्यक्तीच्या नावे अन्य व्यक्तीने अर्ज करणे, त्यासाठी रक्कम घेणे ही आक्षेपार्ह बाब आहे. आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१) अपील निकाली ठेवण्यात येत आहे.
२) संबंधित अर्जावरील स्वाक्षरी कोणी केलेली आहे, रु.२०००/- ची रक्कम नेमकी कोणत्या कामापोटी दिली, याचा लेखी खुलासा अपीलकर्त्याने हा आदेश प्राप्त होताच ८ दिवसांत आयोगास सादर करावा.
३) अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली जि.पुणे यांनी क्रमांक २ मधील स्थितीबाबत स्वतंत्रपणे चौकशी करुन दि.१५.१०.२००८ पर्यंत अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दिनांक : २४-०९-२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपिल निर्गत कार्यक्रम दि.२७.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२९ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विकास भिमराव गायकवाड,<br>मु.पो.वडापूरी, ता.इंदापूर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप अधीक्षक अभियंता,<br>कुकडी प्रकल्प, पुणे ४११ ०११ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप अधीक्षक अभियंता,<br>कुकडी प्रकल्प, पुणे ४११ ०११ | हजर |

अपीलकर्ता श्री. विकास भिमराव गायकवाड यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील प्राप्त तक्रार अर्ज, त्यावरील कार्यवाही, कामे, प्राप्त माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज, दिलेली माहिती इत्यादी सर्व बार्बीची माहिती मागितली होती. तसेच अधिकाऱ्यांचे मत्ता व दायित्वाच्या प्रपत्रांच्या प्रती मागणी केल्या होत्या. मागणी केलेली माहिती ही योग्य स्वरुपाची असल्याने निश्चित स्वरुपात कळवावी, काही माहिती ही कर्मचाऱ्यांची वैयक्तिक असल्याने व कार्यालयात उपलब्ध नसल्याने देता येत नाही, असे अर्जदारास कळविल्याचे व त्यानंतर अर्जदाराने संपर्क साधाला नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

अपीलाच्या सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित राहिला नाही, असे अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले. मागणी केलेली माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिल्यास त्यापैकी हवी असणाऱ्या माहितीची स्पष्ट मागणी करु असे अपिलकर्त्याने 'विशेष अपिल निर्गत निर्गत कार्यक्रमा'मध्ये निवेदनात नमूद केले. त्यास जन माहिती अधिकारी यांनी मान्यता दिली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१.अपील निकाली ठेवण्यात येत आहे.

२.अपीलकर्त्याने माहितीची मागणी स्पष्ट व नेमक्या स्वरुपात करावी, अशी समज देण्यात येत आहे.

पुणे
दि. १०/०९/२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | १०३३ / पुणे | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | श्री. बी. एन. शिंदे<br>गणेशखिंड, पी.बी.नं.१३, पुणे-४११ ००७ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ,<br>प्रशासन विभाग, गणेशखिंड रोड, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कुलसचीव, पुणे विद्यापीठ | हजर |

अपीलकर्ता श्री. बी. एन. शिंदे यांनी दि. १९.१.२००७ रोजी ठेकेदाराबाबतची माहिती मागणारा अर्ज केला होता. दि. ८.२.२००७ रोजी त्यांना शुल्क कळविण्यात आले. परंतु त्यांनी दि. ३०.३.२००७ रोजी शुल्क भरल्यानंतर त्यांना माहिती देण्यात आली. त्यापूर्वीच त्यांनी दि. ७.३.२००७ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचीव, पुणे विद्यापीठ यांच्याकडे अपील केले होते. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्क कळविल्यानंतर ते वेळेत न भरल्याचे नमूद करून अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचीव, पुणे विद्यापीठ यांनी त्यांचे अपील निकाली काढले. आपण प्रथम अपील केल्यानंतर मागील तारीख टाकून पत्र पाठविण्यात आले, असे प्रतिपादन श्री. शिंदे यांनी केले. परंतु कागदपत्रांवरून ते सिध्द होत नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपूर्ण माहिती दिली, म्हणजेच ठेकेदारांची नावे, त्यांच्याकडील कामगार इ. ची माहिती दिलेली नाही, असे श्री. शिंदे यांनी नमूद केले. मात्र मूळ अर्जात त्यांनी ठेका कोणाला दिला याची व त्याबाबतच्या आदेशाच्या प्रतींची माहिती मागितली होती. ही माहिती त्यांना देण्यात आली. अपिलातील निर्णयानंतर ठेकेदार संस्थांच्या मालकांची नावेही कळविण्यात आली. मूळ अर्जाव्यतिरिक्तची माहिती

अपिलात मागता येणार नाही, हे लक्षात घेता मूळ अर्जानुसार दिलेली माहिती अपुरी वा चुकीची म्हणता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**पुणे**
**दि. २९.९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सदाशिव आंगतराव चौरे<br>रा. १६, कल्याणनगर, ३, मजरेवाडी, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर | -- |

अपीलकर्ता श्री. सदाशिव आंगतराव चौरे यांनी दि.३.५.२००७ रोजीचे अर्जान्वये जून १९९५ ते ऑगस्ट २००६ पर्यंत मान्यता काढून घेतलेल्या शाळांची नांवे, मान्यता काढण्याचे निकष, मुख्याध्यापक व इतर कर्मचा-यांना मान्यता देताना कोणते निकष लावले आहेत, याबाबत जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे माहितीची मागणी केली होती.

अपीलकर्त्याला मागणी प्रमाणे माहिती दि. २५.५.२००७ व दि. ६.७.२००७ रोजी दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.६.२००८ रोजीचे पत्रान्वये नमूद केले आहे. दिलेल्या माहितीची प्रत राज्य माहिती आयोगास सादर केली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २३ .९.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.१७.०७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०५०/ पुणे | श्री.श्रीराम व्यंकटेश पांडे, क्षितीज पवार नगर, सांगवी, पुणे | सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी,पुणे | अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी,पुणे | खाजगी शिक्षण संस्थकडे थकलेल्या मिळकत कर राशीबाबत एकूण ६ मुद्यांची माहिती | अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात असल्याच्या कारणास्तव नाकारण्याचा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये भाष्य, मत मागता येणार नाही. मात्र थकबाकी किती आहे, कर किती आकारला, यासारखी माहिती दिली पाहिजे. |
| २ | ११५६/ पुणे | श्री.अर्जुन लहानबा सैद, मु.पो. सणसवाडी, ता.शिरुर, जि.पुणे | नायब तहसीलदार तहसील कार्यालय ता.शिरुर, जि.पुणे | तहसीलदार तहसील कार्यालय ता.शिरुर, जि.पुणे | गाव निहाय तलाठी कोणत्या स्वरुपाची कामे करतात, कोणत्या कामासाठी किती शुल्क घ्यावे यांचे दरपत्रक, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये नियम क्र.४ नुसार सादर करावयाची माहिती | अपीलकर्त्यास माहितीसाठीचे शुल्क भरण्याबाबत कळविले होते. परंतु अपीलकर्त्याने शुल्क भरले नाही. |
| ३ | १२१६/ पुणे | श्री.तुकाराम उध्दव यादव, रा.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे | उप संचालक, भूमी अभिलेख कार्यालय पुणे, जि.पुणे | संचालक, भूमी अभिलेख कार्यालय पुणे, जि.पुणे | दि.२५.०६.२००६ रोजी लेखी तक्रार अर्जावरील कार्यवाहीची माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ११४३/ पुणे | श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण,अब्दुल हमीद शॉपींग सेंटर इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | कृषी उप संचालक, कृषी विभाग, पुणे-५ | सह संचालक कृषी भवन, पुणे-५ | मा.मंत्री,कृषी,महाराष्ट्र शासन यांच्या दि.११.०३.२००२ रोजीच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व श्री.पी.बी.शेळके, तत्कालीन उपविभाग कृषी अधिकारी, बारामती यांच्या विरुध्द दि.३०.०४.२००३ मुंबई येथे केलेल्या आंदोलनानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल | अपीलकर्त्याने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही अहवालावर नियुक्त प्राधिकारी यांचेमार्फत कार्यवाही झाल्यास तसा अहवाल अपीलकर्त्यास देण्यात येईल,असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. अपीलकर्त्याने यांस सहमती दर्शविली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.
२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती द्यावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. २५/०९/२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १६.७..२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपील-कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०६१ / पुणे | श्री. शरद रामण्णा शेट्टी, प्लॉट नं.१४, प्रेमपूजा, विरभद्रनगर, बाणेर, पुणे-४५ | सहाय्यक आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - १८ | अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगर-पालिका, पिंपरी, पुणे-१८ | आरोग्य निरीक्षक पदविका उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या अनुषंगाने एकूण पाच मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे नमूद केले. मात्र प्रश्नोत्तर स्वरूपात माहिती मागता येणार नाही, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे योग्य नाही. ते मुद्दा क्र.४ वगळता इतर मुद्दयांना लागू होत नाही. या मुद्दयांची राहिलेली सर्व माहिती त्वरित व नि:शुल्क द्यावी. सेवा ज्येष्ठता यादी संदर्भातील माहिती देण्याची माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये तरतूद नसल्याचे सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांनी म्हटले आहे. ते पूर्णत: चूक व अज्ञानमूलक आहे. |
| २ | ११८८/ पुणे | श्री. भोला एच. तांबोळी, १५ किंग्ज् गार्डन, क्यू-६८, पुरंदर क्वार्टर्स, पुणे -१ | समाजकल्याण निरीक्षक (राज) अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३, चर्चगेट रोड, पुणे-१ | उप आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्रराज्य ३,चर्चगेट रोड, पुणे | सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाचे दि. १४.१०. २००४ व सामान्य प्रशासन | माहिती प्राप्त झाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | विभागाचे दि. १.१०.२००३ रोजीच्या परिपत्रकानुसार कार्यवाही करावी व श्री. रविंद्र शेखर लाटे यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत | |
| ३ | १०४८ / पुणे | श्री. शिरीष रामदास सरोदे, १बी/ १३, विश्रांती नगर, विठ्ठलवाडी पुणे सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे-५१ | विकास अभियंता पुणे महानगरपालिका, पुणे-५ | नगर अभियंता पुणे महानगरपालिका, पुणे-५ | मौजे कोथरूड स.नं. ७८ व ७९ डावी भुसारी कॉलनी येथील डी.पी. रस्त्याचे विकसना बाबत | आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी निवेदनात नमूद केले. |
| ४ | १२२८ / पुणे | श्री. ज्ञानेश्वर श्रीपती खेडकर मु.पिंपळे-जगताप ता.शिरूर, जि.पुणे | जन माहिती अधिकारी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे | जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे | संपादनाप्रमाणे प्रकल्पग्रस्तास ताबा द्यावा व ताबे पावतीतील चतु:सीमा दुरूस्त करून द्याव्यात. | प्रस्तुत कार्यवाही २ महिन्यांत करण्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. मात्र कार्यवाहीची ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

१. वरील चारही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करून दिल्याबद्दलचा अनुपालन अहवाल दि. ३०.९.२००८ पर्यंत आयोगास पाठवावा.

पुणे
दि. १८ .२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ